# महात्मा फुले कृषी विद्यापीठ

**ग्रामीण कृषि मौसम सेवा**

## कृषी हवामानशास्त्र विभाग

विभाग प्रमुख : डॉ. ज. दा. जाधव — कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ — फोन : ०२०-२५५३८००९


## जळगाव

दिनांक: ०७.१२.२०१८

| मागील आठवड्यातील हवामानस्थिती (दिनांक ०२ डिसेंबर ते ०७ डिसेंबर, २०१८ ) | | | | | | हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक ०८ डिसेंबर ते १२ डिसेंबर, २०१८) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२/१२ | ०३/१२ | ०४/१२ | ०५/१२ | ०६/१२ | ०७/१२ | दिनांक | ०८/१२ | ०९/१२ | १०/१२ | ११/१२ | १२/१२ |
| - | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० |
| - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से.) | ३२ | ३२ | ३१ | ३१ | २९ |
| - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से.) | १७ | १६ | १५ | १२ | १२ |
| - | - | - | - | - | - | ढग स्थिती (आकाश) स. | अंशत: ढगाळ | अंशत: ढगाळ | अंशत: ढगाळ | अंशत: ढगाळ | अंशत: ढगाळ |
| - | - | - | - | - | - | ढग स्थिती (आकाश) दु. | | | | | |
| - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ५९ | ६१ | ५४ | ५६ | ५१ |
| - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ४१ | ४२ | ४१ | २७ | ३० |
| - | - | - | - | - | - | वा-याचा वेग (किमी/ तास) | ६ | ५ | ६ | ६ | ६ |
| - | - | - | - | - | - | वा-याची दिशा स. | पूर्व | पूर्व-ईशान्य | पश्चिम नैऋत्य | पश्चिम वायव्य | पूर्व |
| - | - | - | - | - | - | वा-याची दिशा दु. | | | | | |

## हवामान अंदाजावर आधारीत कृषी सल्ला

भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार जिल्हयात जिल्हयात पुढील ५ दिवस हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. काढणी झालेल्या खरीप पिकांची उन्हात चांगले वळवून सुरक्षित ठिकाणी साठवणुक करावी. हरभरा व गहू पिकाला उपलब्धतेनुसार व अवशक्तेनुसार पाणी द्यावे.

| पिक | पिक अवस्था | कृषी सल्ला |
|---|---|---|
| भाजीपाला | पिक वाढीची अवस्था | ढगाळ वातावरणाची शक्यता लक्षात घेऊन भाजीपाला पिकावरील रस शोषक किडींच्या नियंत्रणासाठी ५ % निंबोळी अर्काची किंवा इमिडाकलोप्रीड १७.८ एस एल २ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. भाजीपाला पिकावरील रोग नियंत्रणासाठी कार्बाडेझिन १० ग्रॅम किंवा कॉपर ऑक्झीक्लोराईड ३० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| चारा पिके | लागवड | ज्या ठिकाणी पाण्याची उपलब्धता आहे त्या ठिकाणी लसूणघास बरसीम, ओट, ज्वारी व मका यासारख्या चारा पिकांची लागवड करावी. खरीप हंगामातील अतिरिक्त हिरवा चारा उपलब्ध असल्यास त्या पासून मुरघास तयार करावे. त्याचा उपयोग चारा टंचाईच्या परिस्थितीत करता येईल. |
| केळी | पिक वाढीची अवस्था | केळी पिकावरील करपा रोग नियंत्रणासाठी रोगग्रस्त पानांचा भाग किंवा पाने काढून जाळावीत. झाडावर कार्बनडेन्झिम १० ग्रॅम किंवा डायथेन एम - ४५, २५ ग्रॅम किंवा कॉपर ऑक्झीक्लोराईड २५ ग्रॅम अधिक चांगले प्रतीचे स्टीकर १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. केळी बागेत काकडी, भोपळा, कलिंगड, खरबूज तसेच मिरची, वांगी यासारखी पिके घेणे कटाक्षाने टाळावे. |
| तूर | पिक वाढीची अवस्था | तूर पिकावरील शेंग अळीच्या नियंत्रणासाठी ५ कामगंध सापळे प्रति हेक्टर लावावेत तसेच ५ % निंबोळी अर्काची फवारणी करावी. तुरीमधील फुलोरा व शेंगा भरण्याच्या अवस्थेमध्ये घाटे अळी / |

| | | |
|---|---|---|
| | | पिसारी पतंग व शेंग माशी यासाठी एकात्मिक किड व्यवस्थापन पध्दतीने नियंत्रण करावे यामध्ये तृण धान्याचे आंतरपिक असल्यास किडीचे प्रमाण कमी राहण्यास मदत होते, एच.एन.पी.व्ही **(HNPV)** य़ा जैविक किडनियंत्रणाचा वापर करावा .फुलकळी लागताना पहिली फवारणी निबोंळी अर्क ५ **%** दुसरी फवारणी पहिल्या फवारणीनंतर १२ ते १५ दिवसांनी हेलीओकील **(HNPV)** ५०० मिली ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रति हेक्टर व गरजेनुसार तिसरी फवारणी १८.५ **%** प्रवाही क्लोरअॅट्रीनिलीप्रोल **(**कोरॅझोन**)** १५० मिली अथवा इमामेक्टीन बेझोएट २०० ग्रॅम ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| कापूस | | गुलाबी बोंड अळीच्या नियंत्रणासाठी कापसाची वेचणी झालेल्या क्षेत्रामध्ये खोडासह समुळ झाडांची काढणी करुन खोल नांगरट करावी व काढलेल्या प-हाट्या जाळून नष्ट करावे. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | जनावराच्या गोठ्यामध्ये व कुकुटपालनात (मोठे बल्प लावावेत) उबदार वातावरण राहील अशी काळजी घ्यावी. |
| ***टिप : शेतकरीबंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी.** | | |